# शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली

## जिल्हा बुलडाणा

चिखली शहरातील रोकडविरहित व्यवहाराचे सर्वेक्षण

वाणिज्य विभाग

सर्वेक्षण अहवाल

सत्र २०१८-१९


प्रा.डॉ.बाळकृष्ण सखाराम इंगळे (सहा.प्रा.वाणिज्य विभाग)

सर्वेक्षण समन्वयक

( M.Com,M.Phil,PhD,SET, D.Litt)


## सर्वेक्षक विद्यार्थी

१. संदिप रविंद्र गवई

२. अंकुश संजय अंभोरे

३. आनंदा शिवाजी गजरे

४. राहूल अशोक हिंगमिरे

५. मंगेश दत्तात्रय मेहेत्रे

७. स्वप्निल भगवान तुपकर

८. कु.कांचन राजेंद्र कऱ्हाडे

९. कु.मनिषा देविदास गवळी

१०. कु.मोनाली पुरुषोत्तम जाधव

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| ०१. | प्रस्तावना | १ ते ५ |
| ०२. | सर्वेक्षणाची उदिष्टये | ६ |
| ०३. | गृहितके | ७ |
| ०४. | व्याप्ती / मर्यादा | ८ |
| ०५ | सर्वेक्षण पध्दती / अभ्यासाची पध्दती | ९ |
| ०६. | विषयाचे महत्व आणि आवश्यकता | १० ते ११ |
| ०७. | माहितीचे विश्लेषण | १२ ते १६ |
| ०८. | गृहितकृत्याची पडताळणी | १७ ते १९ |
| ०९. | उपाययोजना निष्कर्ष | २० ते २१ |

# प्रस्तावना

## *रोकडविरहित व्यवहार एक विश्लेषण*

रोकडविरहित व्यवहार हि संकल्पना तशी पाहता फार जुनी आहे.फक्त काळानुरुप तिचे स्वरुप बदलत गेले.पुरातन काळात जेव्हा पैशाचा उगमच नव्हता तेव्हा पासून हि संकल्पना उदयात आली आहे.भारतामध्ये आज याच संकल्पनेला अंत्यत महत्व प्राप्त झाले आहे.

सुरुवातीच्या काल खंडात (पुरातन युगात) देवानघेवानीचे माध्यम पैसा नव्हता तर वस्तु देवानघेवान हे माध्यम होते.त्याहि अगोदर मनुष्य हा स्वय:पूर्ण होता.स्वता:च्या गरजा स्वत:पूर्ण करण्याईतपत तो स्वय:म निर्भर होता.कारण त्यांच्या गरजा फारच मर्यादित होत्या.सोबतच तो एकटा राहत होता.मात्र हळूहळू त्याच्या बुध्दीचा जसाजसा विकास होत गेला तसतसा तो कुंटूब आणि समाजात (व्यक्तीचा समुह) राहू लागला.त्यामुळे साहजीक कुंटूबाच्या गरजा वाढत गेल्या.हया गरजा पूर्ण करणे त्याला शक्य नव्हते त्याकरीता तो समाजाची / दुसऱ्या कुंटूबाची मदत घ्यायला लागला.जर त्याला एखादी वस्तु पाहिजे असली तर त्याच्या घरातील एखादी वस्तु देऊन तो त्याला हवी असलेली वस्तू घेऊन यायचा आणि यामधून दोन्ही कुंटूब आपआपल्या गरजा पूर्ण करित असत. मग हळूहळू हया गरजा समाजातून (व्यक्तीचा समुह) पूर्ण केल्या जावू लागल्या आणि हयातूनच व्यक्तीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वस्तू विनीमेय पध्दत अस्तित्वात आली.हि पध्दत खूप लोकप्रिय झाली.काहि लोक तर हया पध्दतीचा व्यवसाय करायला लागले.बरेचशे लोक तर समाजाच्या काय गरजा आहेत किंवा लोकाना काय पाहिजे हयाचा विचार करुन त्या सर्व बाबी आपल्याकडे पाठवित असत.तेथून मग व्यवहार केले जाते होते. म्हणजेच थोडक्यात तिथे रोख रकमेशिवाय सर्व व्यवहार पार पाडले जायचे.खऱ्या अर्थाने रोकडविरहित व्यवहाराची संकल्पनाचे मुळ इथेच आहे.त्यानंतरच्या काळात हि संकल्पना हयातील काही समस्येमुळे बंद करण्यात आली (उदा.वस्तुचे विभाजन वस्तुचे वाटप ) त्यानंतर व्यवहाराचे माध्यम बदलले.मात्र अनुक्रमे कवळी,सोने,चोदीचे तुकडे,अफल्युमिनीयमचे तुकडे इ.व्यवहाराचे माध्यम झाले .मात्र कालातंराने हयामध्ये सुध्दा अनेक समस्या आल्यामुळे हया पध्दती बंद पडून पैसा हे माध्यम आले.आणि भारतात हया माध्यमाला जनमान्यता मिळाली सर्व जनतेने त्याला सहजपणे स्विकारले आणि पाहतापाहता पैसा हा सर्व जनतेच्या व्यवहाराचे एक सोपे आणि उत्कृष्ट माध्यम बनले.हा पैसा हे मिळविण्यासाठी लोक खुप कष्ट करु लागले. काहि जन तर वाईट मार्गाचा अवलंब करु लागले.आणि हळूहळू पैसा हे माध्यम न राहता ते माध्य (साध्य) झाले.कारण ज्याच्याजवळ जास्त पैसा त्यालाच प्रतिष्ठा, मान, सन्मान, आदर समाजामध्ये दिला जाऊ लागला.त्यामुळे हा पैसा मिळविण्याकरिता लोक वाटेल त्या सर्व गोष्टी करायला लागल्या.

हयातूनच मोठया प्रमाणात भ्रष्टाचार वाढला कारण वाममार्गाने पैसा घेऊन लोक कामे करुन देऊ लागली.लोक सुध्दा आपलेच काम लवकर करुन घ्यावे हयाकरिता त्याला पैसा देऊ लागले.हयातून फार मोठया प्रमाणात आर्थिक विषमतेची दरी वाढत गेली.ठराविक लोकांकडेच फार मोठया प्रमाणात पैसा येत गेला.बाकीच्या लोकांकडे मात्र आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यातइतपत पैसा आला तर काहिकडे तेवढाही पैसा नव्हता / नाही म्हणून बरेच अर्थतज्ञ असे म्हणतात की आज १०% लोकांकडे अर्थव्यवस्थेतील ९०% पैसा आहे.तर ९० % लोकांकडे फक्त १० % च पैसा आहे ऐवढी भयावहक आर्थिक विषमता आपल्याला समाजात पाहायला मिळते.हि आर्थिक विषमता अशिच कायम राहली तर समाजामध्ये आराजकता वाढेल लोक आपल्याच लोकांचे दुष्मण बनतील समाजामध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती वाढीस लागेल.हे थांबवयाचे असेल आणि अर्थव्यवस्था सुरळीत व कायमस्वरुपी पुढे न्यायची असेल तर आर्थिक विषमता कमी करावी लागेल. जनतेच्या मनातील पैसाचे आकर्षण कमी करावे लागेल.पैसा हा केवळ व्यवहार करण्याचे माध्यम आहे हे त्यांना पटवून सांगणे आवश्यक आहे.मात्र असे करणे म्हणजे एक दिवास्वप्नच आहे. त्याकरीता त्यावर एक उपाय म्हणजेच हा पैसाचा व्यवहारातून बाव करायचा म्हणजेच पैसाच्या व्यतिरीक्त देवानघेवाणिचे व्यवहार पार पाडायचे सुरवातीच्या कालखंडात जसे पैसाच्या शिवाय सर्व व्यवहार वस्तुविनीमेय पध्दतीने पार पाडले जात होते.आता पण सर्व व्यवहार हे पैशाच्या शिवाय पार पडायचे म्हणजेच व्यवहारातून समुळ पैसाच नष्ट करायाचा असे नाही तर पैसा भ्रामक स्वरुपात उपलब्ध राहून सर्व व्यवहार पार पाडले जातील.पैसा हा भ्रामक स्वरुपात जरि असेल तरि सुध्दा देवानघेवानिच्या सर्व व्यवहाराची नोंद हि संबधित बँकेकडे राहील.अशी एक विचारधारा प्रवाहित झाली.

हि विचारधारा आता जरी प्रवाहित झाली असली तरी सुध्दा हया संकल्पनेला खरी सुरवात हि इ.स.१८०६ पासूनच झाली.कारण त्याच कालखंडात भारतात अधिकोषाच्या विकासाला सुरवात झाली होती पैसाच्या स्वरुपात करण्यात आलेल्या व्यवहारामध्ये फार मोठया प्रमाणात अडचणी उद्‌भवत होत्या मोठमोठया व्यवहाराकरीता मोठी रक्कम जवळ बाळगणे हे खुप धोक्याचे होते.तसेच मोठी रक्कम वाहून (स्वतःसोबत) नेणे अडचणी होते. व्यापारामधील हा व्यवहार सुरळीत चालावातसेच व्यवहारामध्ये सुरक्षितता यावी हयाकरिता बँकेने वेगवेगळे दस्ताएवेज तयार केले.व त्याला जनमान्यता मिळवेन घेतली. प्रामुख्याने बँकेने चेक हुंडी व वचनचिठ्ठी हे दस्ताऐवज तयार करुन घेतले.हे दस्तऐवज पैशाच्या मोबदल्यात वापरने जावू लागले आणि हयामध्ये बँक मध्यस्थांची भुमिका पार पाडायला लागली

थोडक्यात येथूनच खऱ्या अर्थाने रोकडविरहित व्यवहाराचा उगम झाला असे आपणास म्हणता येईल.कारण हया तिन्ही दस्तऐवजामध्ये प्रत्यक्ष रोख रकमेचा वापर केल्या जात नाही.तर अप्रत्यक्षपणे व भ्रामक स्वरुपात येथे पैसा वापरला जातो.त्यानंतरच्या काळात इ.स.१८४४ मध्ये खऱ्या अर्थाने रोकडविरहित व्यवहारांना गती मिळाली.१८४४ मध्ये ई-कॉमर्स चा उगम झाला.ई-कॉमर्सच्या माध्यमातून देवानघेवाणीचे व्यवहार व शोधन केल्या जावू लागले.व्यवहाराचे शोधन करण्यासाठी ई-कॉमर्स ने अनेक पयार्य ग्राहकांना दिले.

२० व्या शतकाच्या शेवटी ई-कॉमर्सचा उल्लेख फक्त Business to Business असाच केला जात होता.त्याचे कारणहि तसेच होते .कारण दोन व्यावसायीकांमध्ये मोठया प्रमाणात व्यवहारात होत होते.त्या व्यवहारामध्ये गोपनियता सुरक्षितता असणे आवश्यक होती.त्यादृष्टीने व्यावसायीकांनी ई-कॉमर्स च्या माध्यमातून आपले व्यवहार व्यावसायीकासोबत करणे सुरु केले.केवळ वस्तु व सवोचीच देवाणघेवाण ते करत नसत तर पैशाची देवाणघेवाण सुध्दा ते ई-कॉमर्सच्या माध्यमातून करायला लागले. हयाकरीता बँकेने मध्यस्थांची भूमिका घेऊन हयामधील व्यवहार सुरक्षिततेची हमी घेतली.त्याकरीता बँकांनी ई-शोधनाचे विविध पर्याय उपलब्ध करुन दिलेत.जसे क्रेडीट कार्ड डेबीटकार्डस, इलेक्ट्रॉनिक रोख, इलेक्ट्रॉनिक धनादेश, सायबर कॅश, डिजीटल बटवा, मॉन्डेक्स इ.अश्या विविध पर्यायाच्या माध्यमातून लोक व्यवहारांचे शोधन करायला लागले.मात्र सर्वसामान्य जनता असे ऑनलाईन व्यवहार करायला व त्या व्यवहाराचे शोधन करायला खुप घाबरत होते.कारण हया व्यवहारामध्ये तोटे भरपूर प्रमाणात होते.आपले व्यवहार हे सुरक्षित राहतील का ? हयाबाबत लोकांच्या मनात शंका होती.मात्र हया शंकेचे निरासण करित विविध कंपन्यांनी व बँकांनी सुरक्षिततेची हमी घेतली व तेव्हापासून हया व्यवहारांना आणखी गती मिळाली.त्यामुळे हा व्यवहार केवळ B२B पुरता मर्यादीत न राहता B२C, C२B, G२B,G२C आणि C२C असे व्यवहार होऊ लागलेत.एंकदरितच हया व्यवहारामध्ये आता फार झपाटयाने वाढ होतांना आपणास दिसत आहे.

प्रामुख्याने रोकडविहरीत व्यवहारामध्ये वाढ होण्याचे आणखी एक महत्वपूर्ण कारण आपणास सांगता येईल ते म्हणजे इ.स.१९९१ मधिल सरकारने घेतलेले L.P.G चे धोरणविषय निर्णय उदारिकरण खासगीकरण आणि जागतिकीकरण साधारणत: जागतिकीकरणामुळे कोणतेही व्यक्ती आपली वस्तु व सेवा कोणत्याही बाजारपेठेमध्ये नेऊन विकू शकते.जागतिकीकरणाच्या या धोरणामुळे तर आज आपल्या देशातील वस्तु व सेवा ई-कॉमर्स च माध्यमातून घरबसल्या आपण कोणत्याही देशाला विकू शकतो,व घरबसल्याच त्या व्यवहाराचे शोधन सुध्दा घेऊ शकतो व करु शकतो थोडक्यातच जागतिकीकरण हे सुध्दा रोकडविरहीत व्यवहार पुढे नेण्याकरीता कारणीभूत आहे असे म्हणावे लागेल.तसे पाहता भारतामध्ये रोकडविरहित व्यवहार होत आहेत.मात्र आजहि पाहीजे तसे हे व्यवहार केल्या जात नाहीत.भारतात आजहि मोठया प्रमाणामध्ये रोख पैशाचा वापर केला जातो.

छापील  नोंटाच्या व्यवहारात भारत आघाडीवर आहे.अलिकडच्या काळात प्लॉस्टिकमनी चा वापर वाढला खरे पण तरि सुध्दा प्रामुख्याने कॅशलेस (रोकडविरहित) व्यवहार म्हणजे ज्या व्यवहारामध्ये रोख/रक्कम न वापरता त्याऐवजी इतर पयार्य वापरले जातात जसे प्लॉस्टिकमनी, ई-वॉलेंट, इंटरनेट बँकिंग ज्यामध्ये छापील नोंटाचा अजिबात वापर केला जात नाहि.

मुख्यत:हा अशि व्यवस्था मोठया प्रमाणात अमलात आणने फार गरजेचे आहे.कारण आज रोख रकमेचे वाढलेले अतिप्रमाण हया रोख रकमेला प्राप्त करण्यासाठी चाललेली धडपड हि खूप घातक ठरत आहे.सोबत रोख व्यवहारामुळे कोणत्या व्यक्तीने किती आणी कोणते व्यवहार केले हयावर कोणाचेच नियत्रंण राहत नाही.कॅशलेस व्यवहारामुळे प्रत्येक व्यवहारावर सरकारचे नियंत्रण राहिल.प्रत्येक व्यवहाराची नोंद होईल त्यामुळे होणाऱ्या भ्रष्टाचाराला आळा बसेल.हया कॅशलेस व्यवहाराचे अनेक फायदे आहेत

जसे-

१. छापील नोंटामधून होणाऱ्या गैरव्यवहारांना आळा बसेल.

२. चलन व्यवस्थापन व नोटांच्या छपाईच्या सरकारी खर्च वाचेल.

३. बनावट नोटा छापण्याचा प्रकार बंद होईल.

४. आयकर विभागाकडे प्रत्येक व्यवहाराची नोंद राहील.

५. रोख रक्कम जवळ बाळगण्याची गरज नाही.

६. व्यवहार जलद होतील.

७. सुरक्षित व्यवहार होतील व आपल्याजवळ कायदेशिर पुरावा उपलब्ध होईल.

असे असंख्य फायदे हया कॅशलेस व्यवहारामधून होतात.त्यामुळे आज कॅशलेस व्यवहार मोठया प्रमाणात करणे गरजेचे आहे.कॅशलेस व्यवहारामुळे अर्थव्यवस्थेला सुध्दा मोठया प्रमाणात नवसंजिवनी प्राप्त होईल यात शंकाच नाही.त्यामुळे हे व्यवहार वाढावेत हयाकरिता सरकारने विविध पर्याय उपलब्ध करुन दिलेत

जसे-

१. प्लॅस्टिक मनी (डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड )

२. इंटरनेट बँकिंग

३. ई-वॉलेट / मोबाईल वॉलेट

४. मोबाईल बँक

५. UPI ( United Payment Interface )

६. आधारकार्ड बँकिंग

असे विविध पर्यायामधून कॅशलेस व्यवहार करण्याची सोय आज उपलब्ध आहे. मात्र भारतामध्ये एका कंपनीने केलेल्या सर्वेनुसार भारतातील केवळ २५% लोक वरिल साधनांचा वापर करुन व्यवहार करतात.म्हणजेच आजही ७५% लोक रोख स्वरुपातच व्यवहार करतांना आपण पाहतो.महाराष्ट्राची स्थिती सुध्दा बऱ्याचअंशी अशिच आहे.महाराष्ट्रामधील अमरावती विभाग व हया विभागामधिल ५जिल्हयातील एक जिल्हा म्हणजे बुलडाणा जिल्हा तसे महाराष्ट्राच्या नकाशावर हया जिल्हयाची मागास जिल्हा म्हणून ओळख आहे.हया जिल्हामध्ये रोजगार, शिक्षण, आरोग्य हे फारच कमि आहे.हया सर्व बाबतीत इतर जिल्हयाच्या तुलनेत हया जिल्हयात हया बाबी खूप कमि आहेत.त्यामुळे कॅशलेस व्यवहार तर खूपच लांबची बाब आहे.

हया बुलडाणा जिल्हयातील एकूण १३ तालुक्यामधील चिखली हा एक तालुका हयाच तालुक्यामधील चिखली हे एक गाव तसे हे गाव खूप सुखसंपन्न आणि ऐतिहासिक वारसा लाभलेले येथे पाहिजे त्या प्रमाणात उद्योगधंद्र नाहित पण छोटेमोठे व्यवसाय मात्र खुप आहेत.लहान आणि मध्यम व्यापाऱ्याची संख्या मोठी आहे.हे गाव राष्ट्रीय महामार्गावर येत असल्यामुळे हॉटेल व्यवसायाची संख्या जास्त आहे.तसेच इतर लहान लहान व्यवसाय व शेती करुन या ठिकाणचे लोक आपला उदरनिर्वाह करतांना दिसतात.याच लहानमोठया व्यवसायावर आधारित याठिकाणी ३२ पतसंस्था ०४ अर्बन बँका ०६ राष्ट्रीयकृत बँक येथे आपला व्यवसाय करित आहेत.त्या बँका व पतसंस्था आपला व्यवसाय करित असतांना त्याचे काहि ग्राहक कॅशलेस व्यवहार करतात.तसेच येथे जे लहान मोठे उद्योग व्यवसाय आहेत.त्यामधून किती लोक कॅशलेस व्यवहार करतात हे पाहणे व अभ्यासने गरजेचे वाटले म्हणून चिखली येथील एस.पी.एम.चे तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील अंत्य वर्षाला असणारे फक्त १० विद्यार्थी एकत्रित येवून चिखली गावातील दुकानाचे सर्वे करुन त्याच्याकडून प्रश्नावली भरुन घेतली व त्यामधून वेगवेगळे अनुमान व निष्कर्ष काढता आले.प्रामुख्याने हे महाविद्यालय विद्यार्थ्यामध्ये संशोधन वृत्ती वाढविण्यासाठी अनेक प्रयत्न करित असते.तसेच प्रयत्नाचा एक भाग म्हणजे सध्य: स्थितीमध्ये जो चर्चेमध्ये विषय आहे त्या विषयावर सर्वे करणे हया सर्वेक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढीस लागते.त्याची आकालन शक्ती वाढविण्यास मदत होते.

संशोधन वृत्तीत वाढ व्हावी.विद्यार्थ्यांला समाजा मध्ये जाता यावे व समाजाच्या समस्या जवळून जाणून घेता याव्यात हयाकरिता आमच्या महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील प्रा.डॉ.इंगळे हया मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या वतिने चिखली या गावातील कॅशलेस व्यवहार (रोकड विरहित व्यवहार) एक विश्लेषण' हया विषयाचे विश्लेषणात्मक अध्ययन करुन अहवाल तयार करण्याचे ठरले.आणि हया करीता वाणिज्य अंत्यशाखेच्या ( वर्ष २०१८-१९) १० विद्यार्थ्यांना सोबत घेऊन चिखली गावातील १०० लोकांकडून विशिष्ठ प्रश्नावलीच्या माध्यमातून रोकडविरहित व्यवहार करण्याची संख्या, त्याच्या समस्या जाणून घेता आल्या.संबधित विद्यार्थ्यांमध्ये सुध्दा हयामुळे खुप मोठया प्रमाणात विचारशक्ती, आकालनशक्ती व निर्णयक्षमता वाढीस लागली.थोडक्यात हा सर्वेक्षण करण्यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये हया सर्व गोष्ट वाढीस लागाव्या हाच उद्देशआहे.

## २. सर्वेक्षणाची उद्दीष्टये

प्रामख्याने रोकड़विरहित व्यवीराचे अध्ययन करताना पुढील उद्दीष्टये समोर ठेवून सर्वेक्षण करण्यात आले.

अ. कॅशलेस व्यवहाराविषयी माहिती जाणून घेणे

ब. चिखली शहरातील कॅशलेस व्यवहाराचे अध्ययन करणे

क. कॅशलेस व्यवहारामुळे होणाऱ्या परिणामे अध्ययन करणे.

ड. कॅशलेस व्यवहारातील अडचणी जाणून घेणे.

इ. उपाययोजना सुचविणे.

वरील सर्व उद्दीष्टये डोळयासमोर ठेवून हे सर्वेक्षण करण्यात आले आहे. या उद्दीष्ठया मधून प्रामुख्याने चिखली या गावामध्ये कॅशलेस व्यवहार कसा वाढविला जाईल हे जाणून घेता येईल सोबत संबधित व्यावसायिका समोर कॅशलेस व्यवहार करतांना कोणत्या अडचणी येतात व त्या कश्या सोडविल्या जातील सर्व सामान्य जनता कॅशलेस व्यवहार किती प्रमाणात करतात त्यांना कोणत्या समस्या येतात व त्या सोडविण्यासाठी काय उपाययोजना करता येतिल हयाचा सारासार विचार करुन काही गृहितकृत्ये समोर ठेवलेली आहेत.

## ३. गृहितके

१. कॅशलेस व्यवहाराची संख्या मर्यादित आहे.

२. कॅशलेस व्यवहारकरण्यासाठी उपलब्ध साधनांचा वापर मर्यादित आहे.

३. कॅशलेस व्यवहारात तांत्रीक अडचणी येतात.

४. कॅशलेस व्यवहाराबाबत लोकांमध्ये जनजागृती नाही.

५. कॅशलेस ववहारामुळे व्यवहार करणे सुलभ झाले आहे.

वरिल सर्व गृहितके समोर ठेवूनच हे अध्ययन (सर्वेक्षण ) करण्यात आले.संबधित सर्व गृहितके विशिष्ठ आधारावर पडताळून पाहण्यात आलीत हि पडताळणी करीत असतांना विशिष्ट तक्ते रकाने,लेख,वृत्तांत अहवाल यांच्या आधार घेण्यात आला.तसेच विशिष्ट प्रश्नावली तयार करुन ती विद्यार्थ्यांमार्फत संबधित व्यावसायिकाकडून भरुन घेतल्यानंतर गृहितकृत्यांची त्यावरुन पडताळणी केली व उपाययोजना सुचविल्या आहेत.जेणेकरुन जि गृहितके मांडली आहेत आणि ज्या समस्या त्या अनुसंघाने उद्‌भवल्या आहेत. त्या सोडविण्याच्या दृष्टीने या सर्वेक्षणात्मक विश्लेषणामध्ये प्रयत्न केला आहे.

## ४. व्याप्ती / मर्यादा

**अ. सदर सर्वेक्षणाची व्याप्ती केवळ चिखली शहरापूरती मर्यादीत आहे.**

**ब. सदर सर्वेक्षणाची माहिती फक्त सत्र २०१८-१९ या कालावधितील आहे.**

या संदर्भीत विषयाचे सर्वेक्षण करतांना प्रामुख्याने रोकडविरहित व्यवहार आज काळाची गरज बनत आहे.हि बाब लक्षात घेता मुख्यत: चिखली मध्ये किती लोक हे व्यवहार करतात हे व्यवहार करतांना प्रमुख कोणत्या अडचणी उद्भवतात ग्राहक असे व्यवहार करण्यास प्राधान्य देतात का.येथिल लोकांमध्ये हया व्यवहाराविषयी कितपत माहिती आहे हया समस्या सोडविण्या करिता नेमक्या कोणत्या उपाययोजना आखल्या पाहिजेत अश्या अनेक प्रश्नाची उत्तरे शोधण्याकरिता एस.पी.एम.च्या वाणिज्य अंत्य वर्षातील केवळ चिखली येथिल १०० व्यावसायिकामार्फत प्रश्नावली भरुन घेऊन वरिल अनेक प्रश्नाची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला.तसेच हि प्रश्नावली केवळ २०१८-१९ मध्ये झालेल्या व्यवहाराच्या संदर्भात आहे.व त्यावरुन गृहित कृताची तपासणी (पडताळणी) करण्यात आली आहे.

## ५. सर्वेक्षणाची पध्दती / अभ्यासाची पध्दती

प्रस्तूत विषयाचा अभ्यास करतांना प्रामुख्याने सर्वेक्षण आधार घेण्यात आला.हयामध्ये वाणिज्या च्या अंत्य वर्षाच्या विद्यार्थ्यांनी चिखली शहरामधील १०० व्यावसायिकाकडून (लहान मोठया ) माहिती गोळा करण्याकरिता प्रश्नावली भरुन घेतली हया प्रश्नावलीच्या आधारे विविध व्यावसायिकाकडून रोकडविरहित व्यवहारासंबधी माहिती प्राप्त करण्यात आली आहे.त्यामुळे हया चिखली शहरातील एंकदरित रोकडविरहित व्यवहारा व त्यासंबधीची सखोल माहिती सोबतच किती प्रमाणात लोक हे रोकड व्यवहार करण्यास स्वत:हून तयार आहेत किती व्यावसायीक ग्राहकांना रोकडविरहीत व्यवहार करण्यास प्रोत्साहित करतात त्याचबरोबर हया व्यवहारात कोणत्या अडंचणी उद्‌भवतातअशी विविध स्वरुपाची माहिती गोळा करण्यात आली.हया माहिती वरुन लोकांना उद्‌भलेल्या समस्या सोडविण्याकरिता उपाययोजना सुध्दा सुचविण्यात आल्या व लोकांची मते जाणून घेता आली.हे करण्याकरीता प्राथमिक प्राथमिक स्त्रोतामधिल प्रत्यक्ष निरिक्षण पध्दतीप्रमाण सहभागी निरीक्षाणव्दारे प्रत्यक्ष सहभाग घेऊन माहिती गोळा करण्यात हि माहिती पुढील विद्यार्थ्यांनी गोळा केली.

| | | |
|---|---|---|
| १. | संदिप रविंद्र गवई | बि.कॉम भाग.३ |
| २. | अंकुश संजय अंभोरे | बि.कॉम भाग.३ |
| ३. | आनंदा शिवाजी गजरे | बि.कॉम भाग.३ |
| ४. | राहूल अशोक हिंगमिरे | बि.कॉम भाग.३ |
| ५. | मंगेश दत्तात्रय मेंहेत्रे | बि.कॉम भाग.३ |
| ६. | मंगेश नामदेव मेंहेत्रे | बि.कॉम भाग.३ |
| ७. | स्वप्नील भगवान तुपकर | बि.कॉम भाग.३ |
| ८. | कु.कांचन राजेंद्र कऱ्हाडे | बि.कॉम भाग.३ |
| ९. | कु.मनिषा देविदास गवळी | बि.कॉम भाग.३ |
| १०. | कु.मोनाली पुरुषोत्तम जाधव | बि.कॉम भाग.३ |

वरील सर्व विद्यार्थ्यांनी चिखली शहरामधील छोटया मोठ्या व्यावसायिकाकडे जाणून संदर्भीत विषयाच्या अनुसंघाने तयार करण्यात आलेली प्रश्नावली भरुन घेऊन माहिती गोळा केली.त्याकरीता हया सर्वांनी प्रत्यक्ष सहभाग निरिक्षण पध्दतीचावापर केला.हया उपलब्ध माहितीच्या आधारेच रोकडविरहित व्यवहाराचे विश्लेषण करणे सोपे झाले सोबत विविध निष्कर्ष व वेगवेगळया उपाययोजना सुचविणे सोपे झाले.

## ६. विषयाचे महत्व आणि आवश्यक्ता

रोकडविरहित संकल्पना हि आज काळाची गरज बनली आहे.भारतीय अर्थव्यवस्थेला योग्य चालना देण्याकरीता व प्रगती करण्याकरीता सर्वसामान्य जनतेचे तसेच या देशातील प्रत्येक व्यक्तीचे होत असलेले व्यवहाराचे प्रदर्शन झाले पाहीजे.तसेच त्या व्यवहाराची नोंद असली पाहीजे, कारण जर प्रत्येक व्यवहाराची नोंद जर सरकारी दफ्तरी असेल तर प्रत्येकाची आर्थिक स्थिती लक्षात येईल आणि खरोखरच ज्याची आर्थिक स्थिती खुप हालाखीची असेल अश्या प्रत्येक व्यक्ती करीता, त्यांच्या आर्थिक उन्नतीकरिता सरकारला काहि विशिष्ट प्रयत्न करतायेतील.सोबतच अश्या नोंदीमुळे ज्याचे उत्पन्न विशिष्ट कक्षेबाहेर असेल अश्यांना न चुकता कर भरवा लागेल.आणि हया कराच्या माध्यमातून सरकारजवळ खूप मोठया प्रमाणात पैसा उपलब्ध होऊ शकतो. हया पैसाचा वापर सरकार अप्रगत विभागात वेगवेगळया प्रकल्पाची उभारणी करण्या करिता करु शकतो ज्या प्रकल्पामुळे तेथिल बेरोजगार लोकांच्या हाताला काम भेटेल. आणि त्याची आर्थिक क्षमता उंचावेल. पर्यायाने त्याच्या देरडोई उत्पन्नात वाढ होऊन त्याच्या जिवनमानाचा दर्जा उंचावेल हयातून बचतिच्या प्रमाणात वाढ होऊन प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे भांडवल उभारणीस सरकारला मदत होईल.

भारतीय अर्थव्यवस्थेला अधिक गतिमान करण्याकरिता समाजामध्ये होत असलेल्या प्रत्येक व्यवहाराची नोंद होणे आवश्यक आहे.कारण हयामधून खरे व्यवहार समोर येतील आणि खोटे व्यवहार नष्ट होतील.उदा.एखादा व्यक्ती जर जमिन खरेदी करत असेल तर बाजारमुल्यानूसार त्या जमीनीची किमंत २००००० असेल आणि सरकारीमुल्यानुसार तिची किमंत १००००० असेल तर तो सरकरीमुल्यानुसारच १००००० चेच मुद्रांक शुल्क भरेल सोबतच फक्त खरेदीवर १००००० दिले असे दाखविल.मात्र प्रत्यक्ष तो रोख रक्कम २००००० देत आहे.पण जर हाच व्यवहार रोकडविरहित होत असेल तर त्याला २००००० द्यावे लागतील आणि २००००० ची नोंद होणार तसेच २००००० वर मुद्रांक शुल्क भरावे लागेल.याचाच अर्थ सरकारचा महसूल वाढेल.सरकारी तिजोरीत जास्त पैसा येईल असे अनेक उदाहरणे आपणास सांगता येतील.अश्या व्यवहारामुळे लोक खोटे व्यवहार करणार नाहीत.आयकर विभागाकडे प्रत्येक व्यवहाराची नोंद असेल.तसेच लोंकाना (जनतेला) व्यवहार करण्याकरीता मोठया प्रमाणात रोख रक्कम जवळ बाळगण्याची गरज पडणार नाही.प्रत्येक व्यवहार जलद सोपा सोयीस्कर होईल.आणि आपण केलेल्या प्रत्येक व्यवहाराचा कायदेशिर पुरावा उपलब्ध राहिल.

असे अनेक फायदे हया रोकडविरहित व्यहाराचे आपणास सांगता येतिल थोडक्यात भ्रष्टाचार कमी करायाचा असेल जलद व्यवहार घडवून आणायचे असतिल सर्व व्यवहाराची नोंद हवि असेल आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आज पैशाला साधन नाहीतर साध्य माणले गेले आहे.

परत एकदा पैशाला साधन बनवायचे असेल तर व्यवहारामध्ये रोकडविरहित व्यवहाराची संकल्पना दृढ झाली पाहिजे .कारण रोकडविरहित संकल्पनेमुळे सर्व व्यवहार करण्यासाठी जवळ पैसा ठेवण्याची आवश्यक्ता राहणार नाही. आणि हळूहळू पैशाचे महत्त्व कमि कमि होत जाईल. पर्यायाने पैशाला लोक साधन समजतील त्यामुळे हा पैसा मिळविण्यासाठी लोक जे वाममार्गाचा अवलंब करतात ते करणार नाहित. त्याप्रमाणे सर्व व्यवहाराची शासनदरबारी नोंद झाल्यामुळे सरकारचा महसूल वाढेल.सरकारला जास्त नोटा छपाईचा खर्च येणार नाहि आणि सर्व व्यवहाराचा कायदेशिर पुरावा उपलब्ध राहिल व पर्यायाने अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.थोडक्यात हे सर्व फायदे आपल्या पदरात पाडून घ्यावयाचे असतील तर रोकडविरहित व्यवहार करणे आज काळाची गरज आहे.आणि म्हणून हि गरज ओळखून आम्ही चिखली गावातील लोकांमध्ये रोकडविरहित व्यवहाराची कितपत ओळख आहे, ते व्यवहार करताना उपलब्ध कोणत्या साधनाचा अधिक वापर करतात. त्यांना काहि अउचणी येतात का किती लोकांना रोकडविरहित व्यवहाराची साधणे माहित आहेत.अश्या अनेक प्रश्नाची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करण्यासाठी रोकडविरहित व्यवहार एक विश्लेषण हया विषयावर सर्वेक्षण केले. आणि त्या सर्वेक्षणामधून लोकांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला.लोकांना (जनतेला) व्यापाऱ्याला नेमके हया व्यवहाराबाबत काय वाटते हे जाणून घेतले व त्यांना हा रोकडविरहित व्यवहार किती फायदेशिर आहे.व आज काळाची कशी गरज आहे.हे समजावून सांगितले कारण खुप कमि लोक आज रोकडविरहित व्यवहाराला प्राध्यान देतात. असेदिसून आले त्यामुळे ते प्रमाण वाढले पाहिजे जेणेकरुन अर्थव्यवस्थेला चालना मिळेल भारतीय अर्थव्यवस्थेला गति देण्याकरिता हया विषयाचे खुप महत्व आहे.

## ७. माहितीचे विश्लेषण

रोकडविरहित व्यवहाराच्या संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या अनुसंघाने जि प्रश्नावली विद्यार्थ्यांनी लोंकाकडून (व्यापारीवर्ग) भरुन घेतली त्यातून अनेक प्रश्नाची उत्तरे प्राप्त झाली लोकांची मते जाणून घेता आली त्या सर्व प्रश्नाचे सविस्तर विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

१. रोकडविरहित व्यवहाराची माहिती आहे काय?

| अ.क्र. | उत्तर | % |
|---|---|---|
| ०१ | होय | ३०% |
| ०२ | नाही | ७०% |

टेबल क्र.७.१

वरिल प्रश्नाच्या उत्तरामध्ये ७.१ प्रामुख्याने केवळ ३०% लोंकानाच आज रोकडविरहित व्यवहाराची माहिती आहे.म्हणजेच ७०% लोंकामध्ये आजहि रोकडव्यवहाराविषयी माहिती नाही.

२. पैशाचे हस्तातरण तुम्हाला ऑनलाईन करता येते का ?

| अ.क्र. | उत्तर | % |
|---|---|---|
| ०१ | होय | १५% |
| ०२ | नाही | ८५% |

टेबल क्र.७.२

प्रामुख्याने असे निदर्शणास आले की लोकांना रोकडविरहित व्यवहाराची माहितीच नसल्याकारणामुळे जवळपास ८५% लोक हे पैशाचे हस्तातंरण हे Online करतच नाहि केवळ १५% लोक त्याचा वापर करतांना दिसतात.

३. रोकडविरहित व्यवहार करता का ?

| अ.क्र. | उत्तर | % |
|---|---|---|
| ०१ | होय | ४०% |
| ०२ | नाही | ६०% |

टेबल क्र.७.३

वरील प्रश्नाची उत्तरे लोकांनी बरीच सकारात्मक दिलीत जरि आपल्याला प्रश्न ०१ मध्ये ७०% लोकांना रोकडविरहित व्यवहाराची माहिती नाही. असे दिसत असेल तरी ह्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये लोकांनी सकारात्मक उत्तरे दिलीत.जवळपास ४०% लोक रोकडविरहित व्यवहार करतात जवळपास ३०% लोकांनीच रोकडविरहित व्यवहार करायला पाहीजे पाहीजे होती मात्र येथे ४०% लोक हा व्यवहार करतांना लक्षात आले म्हणजेच १० % लोक हे दुसऱ्याची मदत घेऊन हा व्यवहार पार पाडतात आणि ६०% लोक तर या व्यवहारात पडतच नाहीत.

४. रोकडविरहित व्यवहार करण्यासाठी कोणत्या साधनाचा वापर करता.

| अ.क्र. | साधने | % |
|---|---|---|
| ०१. | Swipe Machine | ०५% |
| ०२. | PayTm | ०३% |
| ०३. | UPI | ०७% |
| ०४. | Bhim App | ०२% |
| ०५. | ATM | ३०% |
| ०६. | Mobile Banking | ०३% |
| ०७. | Cheque | ५०% |

टेबल क्र.७.४

वरिल प्रश्नाची उत्तरे शोधणाचा प्रयत्न करत असताना असे लक्षात आले कि, रोकडविरहित व्यवहार करण्यासाठी जी साधणे उपलब्ध आहेत त्यापैकी Swipe Machine चा वापर ५% लोक करतात.तर Paytm चा वापर केवळ ३% लोक करतात Bhim App चा वापर केवळ २% लोकच करताना दिसून आले. तर ३० % लोक ATM चा वापर करताना दिसूनआले तर आजहि ५०% लोक आपला व्यवहार हा Cheque व्दारेच करायला तयार आहेत.थोडक्यात आजहि लोकांमध्ये इतर साधनाविषयी पाहिजे तशी जनजागृती नाहि.

५. ग्राहक स्वत:हून रोकडविरहित व्यवहार करण्यात तयार आहेत का ?

| अ.क्र. | उत्तर | % |
|---|---|---|
| ०१ | होय | १५% |
| ०२ | नाही | ८५% |

टेबल क्र.७.५

हया प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करत असतांना व्यापारी वर्गाकडून आम्हाला असे लक्षात आले की त्याच्या जवळ येणारा ८५% ग्राहक हे स्वत:हून कधिच रोकडविरहित व्यवहार करण्यास तयार नाहित.तर केवळ १५ % लोक हे स्वत:हून रोकडविरहित व्यवहार करण्यास तयार आहेत.

६. रोकडविरहित व्यवहार करण्यासाठी तुम्ही (व्यापारी) ग्राहकांना आग्रह करता का?

| अ.क्र. | उत्तर | % |
|---|---|---|
| ०१ | होय | ६५% |
| ०२ | नाही | ३५% |

टेबल क्र.७.६

हया प्रश्नाचे उत्तर आम्ही व्यापाऱ्याकडून जाणून घेत असतांना असे लक्षात आले की, ६५% व्यापारी हे ग्राहकांना रोकडविरहित व्यवहार करण्यास आग्रह करतात मात्र ३५% व्यापारी असा आग्रह करित नाहित त्याचे कारण जाणून घेण्याच्या प्रयत्न केला असता असे लक्षात आले की,व्यापाऱ्याच्या मते जर लोकांना रोकडविरहित व्यवहाराची जबरदस्ती केली तर लोक आमच्या जवळून माल खरेदी करित नाहित.आणि सोबतच आमच्याजवळ सुध्दा Swipe Machine नसते त्यामुळे बरेचशे लोक रोकडच्या स्वरुपातच व्यवहार करतात.तसेच काहि लोक असे रोकडविरहित व्यवहार करण्यास खुप घाबरतात हि बाब सुध्दा लक्षात आली .

७.	रोकडविरहित व्यवहार सोईस्कर आहे का?

| अ.क्र. | उत्तर | % |
|---|---|---|
| ०१ | होय | ८५% |
| ०२ | नाही | १५% |

टेबल क्र.७.७

प्रामुख्याने रोकडविरहित व्यवहारामध्ये सुरक्षितता आहे का? हया प्रश्नाची उत्तरे मुख्यत: सकारत्मक प्राप्त झाली जवळपास ८५ % लोकांना हा व्यवहार सुरक्षित व सोइस्कर वाटतो. केवळ १५% लोकांना हा व्यवहारा बाबत भिती वाटते व तो असुरक्षितव किचकट वाटतो.

८.	रोकडविरहित व्यवहार करतांना कोणत्या अडचणी येतात.

| अ.क्र. | अडचणी | % |
|---|---|---|
| ०१ | साधनाची उपलब्धता नाहि | ६५% |
| ०२ | तांत्रिक अडचण | १५% |
| ०३. | व्यवहार ताबडतोब होत नाहित | ०५% |
| ०४. | ग्राहकांना ज्ञान नाहि | २५% |

टेबल क्र.७.८

हया प्रश्नाची उत्तरे आम्ही व्यापाऱ्याकडून जाणून घेण्याचा प्रयत्न केला, तर प्रामुख्याने असे लक्षात आले की,स्वत: त्याच्याजवळच म्हणजेच ६५% व्यापाऱ्याजवळ रोकडविरहित व्यवहार करण्यासाठी आवश्यक ति साधन उपलब्ध नाहित.किंवा हि साधने वापरण्याची त्याची मानसिकता नाहि. कारण त्याची सर्व व्यवहाराची नोंद त्यांना खरी दाखवावी लागेल.व पर्यायाने त्यांना नफेखोरी करता येणार नाहि.म्हणूनच ६५% व्यापारी वर्ग हा रोकडविरहित साधनाचा वापर करतांना दिसत नाहि.सोबतच हे पण लक्षात आले की २५% लोकांना तर हयाविषयी ज्ञान पण नाहि.हा रोकडविरहित व्यवहारकसा करावा ? हयाची माहिती नाहि.तर असा व्यवहार करतांना ५% तांत्रिक अडचण उद्भवते तर ५% असे व्यवहार ताबडतोब घडून येत नाहित.थोडक्यातच व्यापाऱ्यामध्ये हया साधनाविषयी जनजागृती करणे आवश्यक आहे.

९. रोकडविरहित व्यवहार केल्याने फायदा झाला आहे का.

| अ.क्र. | उत्तर | % |
| --- | --- | --- |
| ०१ | होय | ०५% |
| ०२ | नाही | ९५% |

टेबल क्र.७.९

प्रामुख्याने हया प्रश्नाचे उत्तर आम्हाला नकारत्मक मिळाले लोकांना रोकडविरहित व्यवहाराचा कोणताहि आर्थिक फायदा झाला नाहि असे ९५% लोकांनी आम्हाला सांगितले तर केवळ ५% लोकांचे म्हणने आहे की आम्हाला त्याचा आर्थिक फायदा झाला.

थोडक्यात असे लक्षात आले की,जर हया व्यवहारामधून आर्थिक फायदा होत असेल, तरच लोक असे व्यवहार करण्यास पुढे येतिल. अन्यथा आजहि लोक रोकड स्वरुपात व्यवहार करण्यावर अधिक भर देतात.

१०. रोकडविरहित व्यवहार पाहिजे का.

| अ.क्र. | उत्तर | % |
| --- | --- | --- |
| ०१ | होय | ८८% |
| ०२ | नाही | १२% |

टेबल क्र.७.१०

हया प्रश्नाचे उत्तर आम्हाला बराचअंशि सकारत्मक मिळाले ८८% लोकांना असे वाटते की,रोकडविरहित व्यवहार झालेच पाहिजेत मात्र केवळ १२% लोकांना असे व्यवहार खुप कंटाळवाणे वाटत असल्यामुळे लोकांना असे व्यवहार नको आहेत नको वाटत असलेल्या व्यक्तीचे प्रमाण केवळ १२% आहे त्याची वेगवेगळी कारणे असली तरी सुध्दा त्याची हया व्यवहाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक आहे.

थोडक्यात वरीलप्रमाणे प्राप्त माहितीचे थोडक्यात विश्लेषण करण्यात आले.ळया माहितीच्या आणि विश्लेषणाच्या आधारे अनेक वेगवेगळया प्रकारची माहिती समोर आली आहे.

## * गृहित कृत्याची पडताळणी *

रोकडविरहित व्यवहाराचे अध्ययन करताना काहि गृहितके समोर ठेवण्यात आली होती.त्या गृहितीकाची पडताळणी करण्याकरिता विश्लेषण वेगवेगळया सांख्यकीय चाचण्या लावण्यात आल्या त्यामध्ये दोन्हामध्ये असलेला सहसंबध गुण गुणोत्तर प्रमाण माध्य मध्यका आणि मध्यमा हयाचा सुध्दा अंवलब करुन समोर ठेवलेला गृहितके तपासण्यात आलीत.व त्याचे विश्लेषण सुध्दा करण्यात आले गृहितीकांची तपासणी करुन पुढील प्रमाणे त्याची पडताळणी करण्यात आली.

१. कॅशलेस व्यवहाराची संख्या मयादित आहे

या गृहित कृताची पडताळणी करत असतांना असे लक्षात आले की, टेबल क्र.७.१ मध्ये दर्शविल्या प्रमाणे ७०% लोकांना रोकडविरहित व्यवहाराची माहितीच नाहि .केवळ ३०% लोकानाच हया व्यवहाराची संपूर्ण माहिती आहे.त्यामुळे जवळपास ७०% लोक हे व्यवहार करतच नाहि. त्याचबरोबर टेबल क्र.७.५ नुसार तर ८५% लोक हे स्वत:हून रोकडविरहित व्यवहार करण्यास तयार होत नाहित.हयावरुन त्या परिकल्पनेचे येथे समर्थन होवून ते सिध्द होते.

२. कॅशलेस व्यवहार करण्यासाठी उपलब्ध साधनाचा वापर मर्यादित आहे.

हया गृहितकाची तपासणी करताना असे आढळून आले की ,टेबल क्र.७.४ च्या अनुसरुण रोकडविरहित व्यवहार करण्यासाठी जी महत्वाची साधने आहेत त्याचा उपयोग फाच कमि प्रमाणात लोक करतात जसे Swipe Machine ०५% लोक वापरतात. Paytm चा वापर केवळ ३% लोक करतात. तर UPI चा ७% व BHIM APP चा वापर करणारे लोक ०२% आहेत. थोडक्यात हयावरुन आपणास हे लक्षात येते की कॅशलेस व्यवहार करण्यासाठी उपलब्ध साधनाचा वापर मर्यादित आहे त्यामुळे या परिकल्पनेचे येथे समर्थन होवून ते सिध्द होते.

३. कॅशलेस व्यवहारात तांत्रिक अडचणी येतात

प्रामुख्याने कॅशलेस व्यवहार करताना लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते त्यापैकी तांत्रिक अडचण आहे.प्रामुख्याने टेबल क्र.७.८ नुसार ०५% लोकाना तांत्रिक अडचणीचा सामना करावा लावतो तर ०५% लोकाना व्यवहार ताबडतोब पूर्ण होत नाहि हयाचा सामना करावा लागतो थोडक्यात १०% लोकाना तांत्रिक अडचणीचा सामना करावा लागतो.असे प्रामुख्याने येथे दिसून येत आहे.

४. कॅशलेस व्यवहाराबाबत लोकांमध्ये जनजागृती नाही.

प्रामुख्याने टेबल क्र.७.१ नुसार आजहि ७०% लोक आजहि हया व्यवहाराबाबत अनभिज्ञ आहेत. त्याच्यामध्ये जागृती नाहिं ते कॅशलेस व्यवहाराबाबत खुप लांबच आहेत.तसेच टेबल क्र.७.२ नुसार जवळपास ८५% लोकाना पैशाचे हस्तांतरण Online च्या माध्यमातून पैशाचे हस्तांतरण करतांना आपणास दिसतात त्यातही बरेचशे लोक इतराकडून हे व्यवहार करुन होतात.त्याचबरोबर टेबल क्र.७.५ नुसार तर ८५% लोक स्वतःहून कधिच रोकडविरहित व्यवहार करण्यास समोर येत नाहि.

थोडक्यात या सर्व स्पष्टिकरणावरुन हे लक्षात येते की,कॅशलेस व्यवहाराबाबत आजहि लोकामध्ये जनजागृती नाहि.

५. कॅशलेश व्यवहारामुळे व्यवहार करणे सुलभ झाले

प्रामुख्याने हया गृहितकाची पडताळणी करताना असे लक्षात आले की, टेबल क्र.७.७ नुसार ८५% लोकाना असे वाटते की रोकडविरहित व्यवहार करणे सोईस्कर आहे.तर केवळ १५% लोकानाच तो किचकट वाटत सोबत टेबल क्र.७.१० नुसार सुध्दा ८८% लोकाना असे वाटते की रोकडविरहित व्यवहार झाला पाहिजे थोडक्यात टेबल क्र ७.७ नुसार हे सिध्द होते की ८५% लोकाना कॅशलेश व्यवहार करणे सुलभ आहे असे वाटते त्यामुळे हि परिकल्पना येथे सिध्द होते.

थोडक्यात वरिल सर्व गृहितकाची पडताळणी करताना येथे सर्व गृहितके सिध्द झाल्याचे आपणास लक्षात येते.

## * निष्कर्ष *

रोकडविरहित व्यवहाराचे अध्ययन करताना प्रामुख्याने अनेक बाबी समोर आल्यात अनेकांची व्यापाराची सामान्य व्यक्तीची मते जाणून घेता आली आणि त्यांना रोकडविरहित व्यवहाराबात नेमके काय वाटते? हया व्यवहार असाच सतत राहीला पाहिजे काय? त्यात काहि अडचणी आहेत काय? लोक हया व्यवहाराबाबत उदासीन आहेत का? असे अनेक प्रश्नाची उत्तरे शोधता आली.आणि यावरुन खालील काहि निर्सक निघाली ति पुढीलप्रमाणे

१. रोकडविरहित व्यवहाराविषयी बहूतांश लोकाना माहितीच नाहि म्हणजेच तो व्यवहार कसा करतात हयाची माहिती नाहि.

२. रोकडविरहित व्यवहाराची संपूर्ण माहिती नसल्यामुळे ऑनलाईन व्यवहार करता येत नाहित.

३. रोकडविरहित व्यवहारासाठी उपलब्ध असलेल्या साधनाची लोकांना माहिती नाहि.

४. ग्राहक स्वतःहून रोकडविरहित व्यवहार करण्यासाठी तयार नाहि.

५. रोकडविरहित व्यवहार करताना बऱ्याचशा अडचणी उद्‌भवतात

६. रोकडविरहित व्यवहार करताना लोकांच्या मनात व्यवहाराच्या सुरक्षतेबाबत शंका आहे.

*** उपाययोजना ***

प्रामुख्याने रोकडविरहित व्यवहाराविषयी अध्ययन करताना ज्या समस्या लोकाना उद्भविल्या त्या त्यांनी आम्हाला सांगितल्या सोबतच त्याचे काय मत आहे हे सुध्दा सांगितले हया सर्वाचा सारासार अभ्यास करुन काहि पुढील उपाययोजना सुचविल्या

१. रोकडविरहित व्यवहार कसे करावेत हयाविषयी बहूतांश लोकांना माहिती नसल्यामुळे हया व्यवहाराची संख्या खूपच कमि आहे हिसंख्या वाढविण्यासाठी हया लोकांना हया व्यवहाराविषयी माहिती देण्याच दृष्टिने सरकारने मार्गदर्शक नेमुन त्याची कार्यशाळा घेतली पाहिजे व लोकांना त्याविषयी ज्ञानी केले पाहिजेत.

२. प्रामुख्याने रोकडविरहित व्यवहार कसे करावेत हिच माहिती नसल्यामुळे ऑनलाईन व्यवहार होत नाहित ते वाढविण्याकरिता स्वतःहून सरकारने लोकांना त्याबाबतीत जागृत करण्याच्या दृष्टिने फलक स्वरुपात जाहिरातीच्या स्वरुपात किंवा टिव्ही च्या माध्यमातमन जनजागृती केली पाहिजे आणि ऑनलाईन व्यवहार कसा केला पाहिजे हयाविषयी ड़ेमो दाखविला पाहिजे.

३. रोकडविरहित व्यहार करण्यासाठी आवश्यक असलेली जी साधणे आहेत त्याची माहितीच लोकाना नसल्यामुळे सुध्दा व्यवहाराचे प्रमाण कमिच आहे हे टाळण्याकरिता व्यवहारामध्ये जेवढी साधणे उपलब्ध आहेत त्याचा वापर करण्याची सक्ती झाली पाहिजे व त्याची माहिती लोकांपर्यंत संगणक तज्ञाकडून दिली पाहिजे जेणेकरुन त्या सर्व साधनाची माहिती होऊन त्याचा वापर कसा करावा हे लक्षात येईल व व्यवहारात वाढ घडून येईल.

४. रोकडविरहित व्यवहार करण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनाची संख्या वाढविली पाहिजे.

५. रोकडविरहित व्यवहार करण्यास लोक स्वतःहून पुढाकार घेत नाहित त्याकरिता सरकारने रोकडविरहित व्यवहारावर विशिष्ट सुट दिली पाहिजे.जेणे करुन लोकांना त्याचा आर्थिक फायदा होईल जर आर्थिक फायदा होत असेल तर लोक हे व्यवहार करण्यास पुढे येतिल.

थोडक्यात वरिल उपाययोजना जर अमलांत आणल्या गेल्या तर निश्चितच रोकडविरहित व्यवहाराची संख्या वाढीस लागेल व सरकारचे ध्येय धोरण पुर्ण होईल आणि हया व्यवहाराचे होत असलेले असंख्य फायदे समाजाला व्यक्तीला सरकारला घेता येईल व त्यातून एक समाधानी समाज निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल.

## * निष्कर्ष *

चिखली शहरामधील रोकडविरहित व्यवहाराचे सर्वेक्षण करत असतांना लोकांकडून हया व्यवहाराचे अज्ञान असल्याचे आढळून आले .त्याचबरोबर लोकांच्या मनामध्ये हया व्यवहाराबाबत भिती सुध्दा दिसून आली .हे अज्ञान व भिती  दुर करुन जर व्यवहार झाले तर निश्चितच व्यवहाराची संख्या वाढेल सोबतच व्यापारीवर्गाने सुध्दा आपल्या व्यवसायात रोकडविरहित व्यवहार करण्यासाठी आवश्यक त्या साधणाचा वापर करावा. जेणेकरुन लोकांना ते साधन वापरण्यास सोपे होईल तांत्रिक अडचणी दुर कराव्यात सरकारने सुध्दा हे व्यवहार वाढविण्याच्या दृष्टिने प्रयत्न करणे काळाची गरज आहे.

थोडक्यात रोकडविरहित व्यवहार आज काळाची गरज बनले आहे.जर भारतातील भ्रष्टाचार थांबव्यायचा असेल लोकांची पैशाची हाव कमि करायचा असेल आर्थिक विषमतेची दरी कमि करायची असेल आणि सरकारचा महसूल वाढवून भांडवल निर्मीती करावयाची असेल, तर रोकडविरहित व्यवहार महत्वाचे आहे.

धन्यवाद !